# प्रेस नोट

दि. २९/०६/२०१९

**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्ग कडुन सराफी दुकानातील दागिन्यांच्या चोरीचा पर्दापाश पुणे येथील महिला आरोपीस यांस अटक.**

---

कणकवली पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ३९९/२०१८ भादवि कलम ३७९, ३४ प्रमाणे या गुन्हयातील फिर्यादी वामन हरी पेठे ज्वेलर्स या सराफी दुकानाचे व्यवस्थापक यांचे फिर्यादीवरुन दिनांक २८/१२/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात २ अज्ञात महिला यांनी दुकानोच कामगार यांचेकडे सोन्याचे चैन बघता बघता एका महिलेने ३० ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास केले होते.

सदर गुन्हा दाखल होताच गुन्हयाचे ठिकाणी पोनि पाटील व इतर दुय्यम अधिकारी यांनी स्टाफसह भेट देवून गुन्हयाचे घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. त्यात २ महिला दागिने चोरी करीत असताना सीसीटीव्हीमध्ये चित्रीकरण झाले. त्यावरुन स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजचे ॲनलेसीस करुन आरोपीचा पुणे, मुंबई ,कोल्हापूर, गोवा, व इतर जिल्हयातील पोलीस ठाणे यांचेशी संपर्क करुन नमुद आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न करुन सदर महिला आरोपी यांना पुणे येथून शापा रमेश भैसडे, वय-६० वर्षे हीस आज दिनांक २८/०६/२०१९ रोजी ताब्यात घेतले. त्यांनी सदर गुन्हयाची कबुली दिलेली आहे. याच दिवशी या महिलांनी रत्नागिरी बाजारपेठ या ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हा केला असून रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ४२९/१८ भादवि कलम ३७९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तसेच पेडणेकर ज्वेलर्स येथे दिनाक १७/०४/२०१९ रोजी अशा प्रकारचे गुन्हा घडलेला असून सावंतवाडी पोलीस ठाणे गुरन ७७/१९ भादवि कलम ३७९ मध्ये दाखल आहे. नमुद दोन्ही गुन्हयातील २ महिला व १ पुरुष आरोपीत यांना स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेने अटक केली.

पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री. दिक्षीत गेडाम, अपर पोलीस अधीक्षक श्री. निमित गोयल यांनी दिलेल्या आदेशावरुन श्री. प्रल्हाद पाटील , पोलीस निरीक्षक स्थागुशा,पोउनि श्री. रविराज फडणीस पोकॉ/१२०२ संकेत खाडये, पोकॉ६५५ रवी इंगळे, चालक पोहेकॉ/५७७ आशिष गंगावणे व मपोकॉ/१८१ प्रतिक्षा कोरगांवर यांचे पथकाने सदरची कारवाई केलेली आहे.